महाराष्ट्र शासन

उद्योग संचालनालय

जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा

दिनांक  २१/१/२०१०

सायंकाळी  ४.३० वाजता

स्थळ  :-  जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

## जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

**मा. जिल्हाधिकारी, अमरावती महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/१/२०१० रोजी सायंकाळी ४.३० वाजता संपन्न होणा-या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची टिपणी.**

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे. | | दिनांक १३/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे. | | |
| २. | दिनांक १३/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :- | | | | |
| | १. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्या बाबत तसेच गोपाल नगर ते बडनेरा हा मार्ग जड वाहतुकीसाठी बंद करण्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | मागील सभेत महानगरपालिका, अमरावतीचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली होती की रेल्वे ट्रॅकला समांतर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव भूसंपादन विभागास सादर करण्यांत आलेला आहे.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे उप आयुक्त, महानगरपालिका यांना सदर प्रस्ताव पाठविल्याची तारीख कळविण्याची सूचना करण्यांत आली होती, जेणेकरुन भूसंपादन विभागाद्वारे कार्यवाही करता येईल. त्यांचेकडून उत्तर अद्याप अप्राप्त आहे. | महानगर पालिका, अमरावती. | |
| | २. ऑईल मिलचे क्लस्टर अमरावती येथे निर्माण करणेबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती. | मागील सभेत नवीन उद्योग जसे मार्बल/ग्रेनाईट, प्लॅस्टीक इत्यादींचे क्लस्टर तयार करता येईल काय? याबाबत अभ्यास करण्याचा निर्णय घेण्यांत आला होता, औद्योगिक संघटनेने इंजिनियरींग वर्कशॉप, रेडीमेड गारमेंट या उद्योगांचा सुध्दा क्लस्टरकरीता विचार व्हावा, अशी सूचना केली होती.<br>क्लस्टर होल्डरच्या ७० टक्के वाट्याकरीता सविस्तर प्रस्ताव औद्योगिक संघटनानी तयार करुन विदर्भ वैधानिक विकास मंडळ यांना सादर करण्याची सूचना करण्यांत आली होती. तथापि औद्योगिक संघटनेकडून प्रस्ताव अद्याप सादर करण्यांत आलेला नाही. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशन, अमरावती. | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्यःस्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | ३. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून रु. १०.५० प्र.घ.मि. या दराने औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरविण्याकरीता लागणारी जलवाहिनी इत्यादीची सुविधा पुरविण्या बाबतचा प्रस्ताव मऔविम, मुंबईला पाठविण्यांत आला असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी घरगुती वापराच्या दराऐवजी वाणिज्यिक दर आकारण्यांत येईल, असे कळविले आहे.<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावतीचे सभेला स्वतः उपस्थित नव्हते. त्यांनी दि. ७/१२/२००९ चे पत्रान्वये खुलासा सादर केलेला आहे की दि. १४ व १५/११/२००९ रोजी मुंबई येथे जीवन प्राधिकरण, मुंबईच्या सभेला उपस्थित राहावयाचे असल्यामुळे ते दि. १३/११/२००९ रोजी जिल्हा उद्योग मित्र सभेला उपस्थित राहू शकले नाही. | मऔविम, अमरावती.<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती. | |
| | ४. एमआयडीसी अमरावती येथे उद्योगासाठी सब-स्टेशन मंजूर करणेबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी अमरावती येथे भविष्यात येणा-या उद्योग घटकांची विद्युत पुरवठयाची गरज लक्षांत घेता सद्यःस्थितीत असलेला विद्युत भार वाढविण्यांत यावा अशी औद्योगिक संघटनेची मागणी होती. तसेच प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांनी कार्यकारी अभियंता, मराविविकंम (ओ अँड एम), अमरावती यांना पत्र दि. १६/१२/०८ अन्वये मराविविकंमच्या मुलभूतसोयी योजना अंतर्गत सदर सब-स्टेशनचा प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती केली आहे.<br>मागील सभेत नविन उद्योजकांना देण्याकरीता आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्ध आहे. तसेच सब-स्टेशन उभारणीकरीता आवश्यक कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती देण्यांत आली होती. | मऔविम, अमरावती. | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | ५. नांदगांवपेठ एमआयडीसी मधील भूखंड उपलब्ध करण्याबाबत तसेच स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसियेशन, अमरावती. | नांदगांवपेठ पंच तारांकित औद्योगिक वसाहतीत भूखंड मिळण्याकरीता २५०-३०० प्राप्त अर्जामध्ये दिल्लीच्या उद्योजकांचे अर्ज जास्त असल्यामुळे सदर अर्ज मऔविमद्वारा प्रलंबीत ठेवण्यांत आलेले आहेत.<br>सभेत ठरल्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांचे दिनांक ५/१२/२००८ चे अर्ध शासकिय पत्रान्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना स्थानिक उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे, अशी विनंती करण्यांत आली होती.<br>प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांनी एका महिन्यांत भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यांत येईल, असे मागील सभेत सांगीतले होते. ते सभेला पुढील प्रगतीची माहिती देतील. | | |
| | ६. वजन व मापे कार्यालयाने निश्चित केलेल्या एका अटीचीही पूर्तता नसली तरी पेनॉल्टी लावत असल्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसियेशन, अमरावती. | सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशस्त्र (वजन व मापे), अमरावती यांनी माहिती दिली होती की आकारण्यांत येत असलेला दंड हा नियमानुसार असतो. सदर दंड हा केंद्र शासनाच्या कायद्यानुसार असून त्याप्रमाणे अंमलबजावणी त्यांच्या कार्यालयाद्वारे करण्यांत येते. करीता त्यांना अटीची पूर्तता करण्याबाबतची चेकलीस्ट औद्योगिक संघटनेला देण्याची सूचना करण्यांत आली होती.<br>मागील सभेत वैध मापनशस्त्र (वजन व मापे), अमरावती कार्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्यामुळे सदर विषयावर चर्चा होऊ शकली नव्हती. | वैध मापन शास्त्र (वजन व मापे), अमरावती. | |
| | ७. इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस मिळणेबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती. | पुरवठा विभागास एकूण १३ उद्योग घटकांना केरोसीन वाटपाकरीता प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राद्वारे दि. १६/१/२००६ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. दि. ४/११/२००८ रोजी झालेल्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे मागील सर्व संदर्भासह पुन्हा दि. १२/११/२००८ रोजी प्रस्ताव यादीसह सादर करण्यांत आलेला आहे.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती यांना औद्योगिक संघटनेच्या पदाधिका-या समवेत सभा घेण्याकरीता तारीख निश्चित करण्यास्तव कार्यालयीन पत्र दिनांक २/१२/२००९ व १४/१/२०१० अन्वये कळविण्यांत आले आहे. तथापि त्यांचेकडून तारीख प्राप्त न झाल्यामुळे सदर सभा घेण्यांत आली नाही. | पुरवठा विभाग, अमरावती. | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | ८. मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागेचे वाटप करण्याबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती | मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला सद्य:स्थितीतील उद्योगाला सुरळीत चालु ठेवण्याकरीता व भविष्यामधील विस्तारीकरणाकरीता अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागा वाटप करण्यांत यावी, याबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक २४/३/२००६ चे पत्रान्वये विनंती केलेली होती.<br>मऔविमचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली होती की सदर उद्योग घटकास पत्राद्वारे त्रुटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यांत आले आहे. तसेच या कार्यालयाद्वारे पत्र दि. २/१२/०९ अन्वये त्रुटीची पूर्तता करण्याबाबत कळविले आहे. तथापि अद्यापपावेतो त्रुटीची पूर्तता करण्यांत आलेली नाही. | मऔविम, अमरावती | |
| | ९. सुपर एक्सप्रेस बायपास एमआयडीसी टी पॉईंटवर आरटीओचे अधिका-याद्वारे वाहन तपासणी करण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरा येथे करण्या बाबत. | अमरावती एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजक. | कार्यालयीन दिनांक २७/७/२००९ व २/९/२००९ चे पत्रान्वये प्रादेशिक मार्ग परिवहन अधिकारी, अमरावती यांना योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत आलेली आहे.<br>औद्योगिक संघटनेने माहिती दिली की वाहन तपासणी मध्यंतरी बंद करण्यांत आली होती, ती आता पुन्हा सुरु करण्यांत आली आहे.<br>सभेला परिवहन कार्यालयाचे अधिकारी उपस्थित नसल्यामुळे सद्य:स्थितीबाबत माहिती मिळू शकली नाही.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष महोदयांचे सहीचे पत्र दि. ३०/११/२००९ व कार्यालयीन पत्र दि. १४/१/२०१० अन्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना सद्य:स्थिती कळविण्याची विनंती करण्यांत आली आहे. तथापि त्यांचेकडून उत्तर अप्राप्त आहे. | प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | १०. अमरावती एमआयडीसी क्षेत्राला न्यू इंडस्ट्रीयल टाऊनशीप म्युनिसिपल काऊंसीलचा दर्जा मिळण्या बाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती | एमआयडीसी येथे मनपाचा मालमत्ता कर, ऑक्ट्राय, एमआयडीसी चे सर्व्हीस चार्जेस व वॉटर चार्जेस लागू आहेत. अमरावती महानगरपालिका अस्तित्वात आल्यावर उद्योजकांना कच्चा मालावरील जकात कर अर्धा टक्के, कारखान्याच्या बांधकामावर १० पैसे व १५ पैसे प्रति चौ. फुट या सवलतीच्या दराने मालमत्ता कराची आकारणी केली जात होती. आता रु. १.५० प्रति चौ. फुट दर आकारला जात आहे. त्यामुळे येथील उद्योजक शेजारील जिल्ह्यामधील उत्पादनांच्या किंमती सोबत देखील स्पर्धा करु शकत नाही. सभेत ठरल्याप्रमाणे उद्योग मित्र, मुंबईला सदर विषय राज्य स्तरीय उद्योग मित्र सभेत चर्चेसाठी घेण्याची विनंती करण्यांत आली आहे.<br>सदर विषयावर राज्यस्तरीय उद्योग मित्र सभेत चर्चेसाठी शिफारस करण्यांत आली असल्यामुळे, या समितीच्या विषयसूचीवरुन विषय कमी करण्यांस हरकत नसावी. | उद्योग मित्र, मुंबई<br><br>अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती. | |
| | ११. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा बंदोबस्त करण्याबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | सभेचा संदर्भ देऊन कार्यालयीन पत्र दि. २/९/२००९ अन्वये एमआयडीसी परिसरात डुकराचा बंदोबस्त तसेच साफसफाई करण्यांबाबत व फॉग मशिनद्वारे फवारणी करण्यांत यावी या औद्योगिक संघटनेच्या मागणी संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याबाबत उप-आयुक्त (प्रशासन), महानगर पालिका, अमरावती यांना कळविण्यांत आले आहे. मागील सभेत उप आयुक्त (प्रशासन)महानगरपालिका यांना पुढील सभेला उपस्थित राहण्याविषयी कळविण्याची सूचना करण्यांत आली होती.<br>उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका हे सभेला सद्य:स्थिती विषयी माहिती देतील. | महानगर पालिका, अमरावती. | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | १२. मे. राधिका पॅकेजींग प्रा. लि., सी-२२, एमआयडीसी अेरिया, नांदगांव पेठ या उद्योग घटकामध्ये काम करणा-या तंत्रज्ञ / कामगार याच्यावर वारंवार हमला करुन मारझोड केल्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | नांदगांव पेठ येथील सदर उद्योग घटकात काम करणा-या तंत्रज्ञ व कामगार यांच्यावर कांही असामाजिक तत्व हमला करुन मारझोड करीत आहेत, अशी तक्रार करण्यांत आली होती. याबाबत रितसर पोलिस स्टेशनमध्ये तक्रारीची नोंद करण्यांत आलेली आहे. तथापि याबाबत त्यांचेकडून संबंधितावर कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. यामुळे त्यांचेकडे काम करीत असलेले तंत्रज्ञ / कामगार काम सोडून पळून जातील, अशी भिती व्यक्त करण्यांत आली होती.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना पोलिस विभाग, जिल्हा परिषद यांचे समवेत बैठक घेऊन तोडगा काढण्याची विनंती कार्यालयीन पत्र दि. १२/१२/२००९ अन्वये करण्यांत आली आहे. ते पुढील प्रगतीची माहिती सभेला देतील. | पोलिस विभाग, अमरावती.<br><br>मऔविम, अमरावती. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय. | | | | |
| | १. एमआयडीसी, अचलपूर येथील भूखंड क्रमांक बी-४२ वर स्थानिक लोक बांधकामा मध्ये अडथळे निर्माण करीत असल्याबाबत. | दि अचलपूर तालुका महाबचत संघ, अचलपूर. | दि अचलपूर तालुका महाबचत संघ या बेरोजगार युवकांच्या संघटनेला एमआयडीसी अचलपूर येथे भूखंड क्रमांक बी-४२ चा ताबा ४/६/२००९ रोजी देण्यांत आला. सदर प्लॉटवर बांधकाम करण्याच्या दृष्टीने पाहणी करण्यास गेले असता त्यांना मारहाण करण्याची व आत्महत्या करण्याची धमकी दिली, अशी तक्रार सदर संघटनेने दिनांक ११.१२.२००९ चे पत्रान्वये केली.<br>या संबंधात कार्यालयीन पत्र दिनांक ११.१२.२००९ अन्वये प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत आली.<br>तसेच पोलीस स्टेशन अधिकारी, परतवाडा यांना सदर संघटनेने त्यांचेकडे दाखल केलेल्या दिनांक ३/७/२००९ च्या तक्रारीनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती कळविण्याची विनंती केली होती. त्यांचेकडून पत्र दिनांक १९.१२.२००९ अन्वये गैर अर्जदार सौ. ललीता शंकरराव बाहेकर आणि श्री. रविकांत शंकरराव बाहेकर, रा. जिवनपुरा. अचलपूर यांचे विरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल करुन प्रतिबंधक कार्यवाही करण्यांत आल्याची माहिती कळविण्यांत आली आहे. | मऔविम, अमरावती. | |

महाव्यवस्थापक,
जि.उ.कें. तथा
सदस्य-सचिव, जि.उ.मि.,
अमरावती.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय**

**जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती**

**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा**

**दिनांक २१/१/२०१०**

**सायंकाळी ४.३० वाजता**

**स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**

जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

मा. श्री. सुरेशकुमार इंगोले, अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दिनांक २१/१/२०१० रोजी सायंकाळी ४.३० वाजता संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे. | | श्री. जी. ओ. भारती, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी माहिती दिली की मा. जिल्हाधिकारी महोदया यांच्या प्रशासनिक कामातील व्यस्ततेमुळे मा. श्री. सुरेशकुमार इंगोले, अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न होत असल्याचे जाहीर केले व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जिल्हा उद्योग मित्र समिती सभेच्या कामकाजास सुरुवात केली.<br>महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी माहिती दिली की दिनांक १३/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे. कोणीही हरकत उपतस्थित न केल्यामुळे सर्व संमतीने इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.<br>सभेला उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे. | |
| २. | दिनांक १३/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :- | | | |
| | १. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्याबाबत तसेच गोपाल नगर ते बडनेरा हा मार्ग जड वाहतुकीसाठी बंद करण्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | गोपाल नगरकडील ट्रक वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सिपना कॉलेज ते एमआयडीसी हा रस्ता करण्यांत यावा, अशी मागणी औद्योगिक संघटनने केली. या मागणीच्या संदर्भात बडनेरा रोड ते मिनी बायपास रोड असा एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याची कार्यवाही महानगरपालिका, अमरावतीमार्फत सुरु आहे.<br>मागील सभेत महानगरपालिका, अमरावतीचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की बडनेरा रोड ते मिनी बायपास रोड असा एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव भूसंपादन विभागास सादर करण्यांत आला आहे. मा. अध्यक्ष महोदयांनी माहिती दिली की मागील प्रस्ताव हा खारीज करण्यांत आलेला आहे. करीता सदर रस्ता अधिग्रहण करण्यास्तव मागणी नोंदविण्याकरीता पुन्हा भूसंपादन विभागास पत्र सादर करावे, जेणेकरुन सदर बाबतीत | महानगर पालीका |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कार्यवाहीस गती देता येईल. | |
| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
| | २. ऑईल मिलचे क्लस्टर अमरावती येथे निर्माण करणेबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती. | उद्योग संचालनालय, मुंबईचे पत्र दिनांक ५ फेब्रुवारी २००७ अनुसार अमरावती येथे उद्योगाचे क्लस्टर निर्माण करण्याकरीता एसआयसीडीपी योजनेअंतर्गत तेल गिरण्याचे क्लस्टरची निवड करण्यांत आली आहे. तथापि ऑईल मिलचे क्लस्टर शक्य नसल्यास नवीन उद्योग जसे मार्बल/ ग्रेनाईट, प्लॅस्टीक इत्यादींचे क्लस्टर, इंजिनियरिंग वर्कशॉप, रेडीमेड गारमेंट या उद्योगांच्या क्लस्टरकरीता औद्योगिक संघटनेने पुढाकार घ्यावयास पाहिजे. तसेच एका क्लस्टरकरीता कमीतकमी २० उद्योजकांनी एकत्र यावयास पाहिजे, अशी चर्चा मागील सभेत झ ाली होती.<br>मागील सभेत क्लस्टर होल्डरच्या ७० टक्केच्या सहभागाकरीता सविस्तर प्रस्ताव औद्योगिक संघटनेने तयार करुन विदर्भ वैधानिक विकास मंडळ यांना सादर करावा, अशी सूचना करण्यांत आली होती. औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी यांनी याबाबत तूर्त कार्यवाही करण्यांत आलेली नसल्याचे सांगीतले. करीता सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा असे ठरले. (विषय बंद). | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशन |
| | ३. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रु. १०.५० प्र.घ.मि. या दराने औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरविण्याकरीता लागणारी जलवाहिनी इत्यादीची सुविधा पुरविण्या बाबतचा प्रस्ताव मऔविम, मुख्यालय, मुंबईला मंजूरीकरीता पाठविण्यांत आलेला असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी घरगुती वापराच्या दराऐवजी वाणिज्यिक वापराचा दर आकारण्यांत येईल, असे कळविले आहे.<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांनी माहिती दिली की याबाबतचा प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यांत आलेला आहे. या संदर्भात सिडकोद्वारा आकारण्यांत येत असलेले दर लागू करणेबाबत शक्यता पडताळून पाहण्यांत येत आहे.<br>औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी यांनी प्रथम सिडकोचे दर काय आहेत याची माहिती मिळाल्यानंतरच ते दर मान्य करावे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यांत येईल, असे सांगीतले. | मऔविम<br><br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ४. एमआयडीसी अमरावती येथे उद्योगासाठी सब-स्टेशन मंजूर करणेबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी अमरावती येथे भविष्यात येणा-या उद्योग घटकांची विद्युत पुरवठयाची गरज लक्षांत घेता सद्यःस्थितीत असलेला विद्युत भार वाढविण्यांत यावा अशी औद्योगिक संघटनेची मागणी होती. तसेच प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांनी कार्यकारी अभियंता, मराविविकंम (ओ अँड एम), अमरावती यांना पत्र दि. १६/१२/०८ अन्वये मराविविकंमच्या मुलभूतसोयी योजना अंतर्गत सदर सब-स्टेशनचा प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती केली आहे.<br>मराविविकंचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की ३२ केव्हीए सब स्टेशन अस्तित्वात आहे व अतिरिक्त १० के.व्ही.ए. सब-स्टेशनची उभारणी सुरु आहे, अशा परिस्थितीत नवीन सब-स्टेशनची आवश्यकता पडणार नाही.<br>औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी यांनी मराविविकंचे प्रतिनिधी यांना सूचना केली की सदर सब-स्टेशनच्या मागणीची आवश्यकता नसल्यास तसे पुढील सभे पर्यंत माहिती द्यावी, जेणेकरुन आवश्यकता नसल्यास सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांस हरकत नाही. | मऔविम<br><br>मराविविकंम |
| | ५. नांदगांवपेठ एमआयडीसी मधील भूखंड उपलब्ध करण्याबाबत तसेच स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | नांदगांवपेठ पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीत भूखंड मिळण्याकरीता २५०-३०० प्राप्त अर्जामध्ये दिल्लीच्या उद्योजकांचे अर्ज जास्त असल्यामुळे सदर अर्ज मऔविमद्वारा प्रलंबीत ठेवण्यांत आलेले आहेत. मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे दिनांक ५/१२/२००८ चे अर्ध शासकिय पत्रान्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे यादृष्टीने कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे.<br>तसेच मऔविम, मुंबई कार्यालयाकडून मंजूरी लवकरच पाठविण्यांत येत आहे व एक महिन्यात भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यांत येणार होती. तशी परवानगी प्राप्त झालेली नाही, अशी माहिती मागील सभेत देण्यांत आली होती<br>विभागीय अधिकारी, मऔविम, अमरावती सभेला उपस्थित नसल्यामुळे सदर विषया संबंधात सद्यःस्थितीबाबत माहिती सभेला होऊ शकली नाही. | मऔविम |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ६. वजन व मापे कार्यालय आकारत असलेल्या दंडा बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसियेशन, अमरावती. | वजन व मापे कार्यालयांनी निश्चित केलेल्या अटी हया जाचक असल्यामुळे एक अटही पूर्ण करावयाची राहिली तरी पेनॉल्टी लावण्यांत येते, असे निवेदन औद्योगिक संघटनेने सादर केले होते. करीता औद्योगिक घटकांनी करावयाच्या पूर्ततेबाबत एक चेक लिस्ट औद्योगिक संघटनेला पुरवावी, असे ठरले होते.<br>वैध मापनशस्त्र (वजन व मापे), अमरावती यांनी माहिती दिली की या संदर्भात एक सेमिनार औद्योगिक परिसरांत आयोजित करण्यांत आलेला आहे. तसेच चेक लिस्ट संबंधात पुस्तिका सभेमध्ये औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधीना देण्यांत आली. करीता सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा, असे ठरले. ( विषय बंद ). | वैध मापन शास्त्र (वजन व मापे) |
| | ७. इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस मिळणेबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती. | इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस निर्गमित करणे शासनाने बंद केले आहे, ते देणे पूर्ववत सुरु करण्यांत यावे, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली होती. पुरवठा विभागास एकूण १३ उद्योग घटकांना केरोसीन वाटपाकरीता प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राद्वारा दि. १६/१/२००६ रोजी सादर करण्यांत आलेला होता. दि. ४/११/२००८ रोजी झालेल्या सभेत ठरल्याप्रमाणे मागील सर्व संदर्भासह पुन्हा दि. १२/११/२००८ रोजी प्रस्ताव यादीसह त्यांना सादर करण्यांत आलेला आहे.<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती यांनी माहिती दिली की उद्योगांना रॉकेलच्या पुरवठ्याबाबत डिलरशीपचा प्रस्ताव शासनास दिनांक १८/६/२००९ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. तथापि परवाना नसल्यामुळे वाटपाबाबत कार्यवाही होऊ शकली नाही. | पुरवठा विभाग |
| | ८. मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागेचे वाटप करण्याबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती | मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाने दिनांक २९/१२/२००८ चे पत्रान्वये असे कळविले होते की सदर उद्योग घटकाला सद्य:स्थितीतील उद्योगाला सुरळीत चालु ठेवण्याकरीता व भविष्यामधील विस्तारीकरणाकरीता अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागा वाटप करण्यांत यावी. याबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक २४/३/२००६ चे पत्रान्वये विनंती केलेली होती. कार्यालयीन पत्राद्वारे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक ७/१/२००९ चे पत्रान्वये सद्य:स्थिती कळविण्याची विनंती करण्यांत आलेली आहे<br>मऔविमचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की सदर उद्योग घटकास पत्राद्वारे त्रुटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यांत आले होत, त्याप्रमाणे त्रुटीची पूर्तता करण्यांत आली आहे व आता प्रस्ताव एका आठवड्यांत मुख्यालयास सादर करण्यांत येत आहे | मऔविम |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ९. सुपर एक्सप्रेस बायपास एमआयडीसी टी पॉईंटवर आरटीओचे अधिका-याद्वारे वाहन तपासणी करण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरा येथे करण्या बाबत. | अमरावती एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजक. | एमआयडीसी क्षेतातील उद्योजकांनी दिनांक १८/७/२००९ चे पत्रान्वये निवेदन सादर केले की सुपर एक्सप्रेस रोडवरील टी-पॉईंटवर आरटीओ अधिका-याद्वारा वाहने तपासणीसाठी थांबविली जातात. त्यामुळे एमआयडीसीमध्ये ये जा करणा-या वाहनाना अडथळा निर्माण होतो. तसेच त्यामुळे एमआयडीसीमधील कच्चामाल व पक्क्या मालाची ने आण करणा-या वाहन चालकांना त्यांच्याजवळ आवश्यक ती कागदपत्रे असूनसुध्दा आरटीओ अधिका-यांच्या तपासणीचा त्रास होतो, त्यामुळे ते एमआयडीसीमध्ये येण्याचे टाळतात. करीता सदर टी पॉईंटवर वाहने थांबविण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरामध्ये चेकपोस्ट आहे, तेथे वाहने थांबवावीत, असे सूचविले आहे.<br>कार्यालयीन पत्र दिनांक २७/७/२००९ व मागील सभेतील चर्चेनुसार २/९/२००९ चे पत्रान्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत आलेली आहे.<br>प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांनी सदर टी पॉईंटवर दररोज वाहनांची तपासणी होत नाही, असे सांगीतले. तथापि औद्योगिक संघटनेने ते मान्य केले नाही व दररोज वाहनांची तपासणी सुपर एक्सप्रेस रोडवरील टी-पॉईटवर होत असल्याचे सांगीतले.<br>चर्चेनंतर मा. अध्यक्ष महोदयांनी वाहनांची तपासणी सदर टी पॉईंटपासून १०० त २०० मिटर अंतर पुढे करावी, अशी सूचना केली. सदर सूचना प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांनी मान्य केली. | प्रादेशिक परिवहन कार्यालय |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | १०. अमरावती एमआयडीसी क्षेत्राला न्यू इंडस्ट्रीयल टाऊनशीप म्युनिसिपल काऊंसीलचा दर्जा मिळण्या बाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती | औद्योगिक संघटनेने निवेदन सादर केले होते की अमरावती एमआयडीसी ही महानगरपालिका हद्दीमध्ये असणारी एकमेव एमआयडीसी आहे. मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे येथे मनपाचा मालमत्ता कर, ऑक्ट्राय, एमआयडीसी चे सर्व्हीस चार्जेस व वॉटर चार्जेस लागू आहेत. अमरावती महानगरपालिका अस्तित्वात आल्यावर उद्योजकांना कच्चा मालावरील जकात कर अर्धा टक्के, कारखान्याच्या बांधकामावर १० पैसे व १५ पैसे प्रति चौ. फुट या सवलतीच्या दराने मालमत्ता कराची आकारणी केली जात होती. आता रु. १.५० प्रति चौ. फुट दर आकारला जात आहे. त्यामुळे येथील उद्योजक शेजारील जिल्ह्यामधील उत्पादनांच्या किंमती सोबत देखील स्पर्धा करु शकत नाही. करीता अमरावती एमआयडीसी क्षेत्राला इंडस्ट्रीयल टाऊनशीप म्युनिसिपल काऊंसीलचा दर्जा मिळावा, अशी मागणी केली होती.<br>सदर विषयावर शासन स्तरावर पाठपुरावा करण्यांत यावा, असे मागील सभेत ठरले होते. त्याप्रमाणे कार्यालयीन पत्र दिनांक २२/७/२००९ अन्वये निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई यांना शासन स्तरावर पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने सदर विषय राज्य स्तरीय समितीमध्ये चर्चेसाठी घेण्यांत यावा, अशी विनंती करण्यांत आलेली आहे. करीता सदर विषय या समितीच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा, असे ठरले. (विषय बंद ). | मऔविम |
| | ११. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा बंदोबस्त करण्याबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा त्रास उद्‌भवत आहे, करीता लवकरच बंदोबस्त करण्यांत यावा. तसेच सदरील परिसरात सगळीकडे घाण पसरली असल्यामुळे मच्छरांचा त्रास वाढला आहे, करीता महानगरपालिकाद्वारा फॉग मशिनद्वारे फवारणी करण्यांत यावी, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली. मागील सभेत ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेला कार्यालयीन पत्र दिनांक २/९/२००९ अन्वये योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.<br>औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी यांनी माहिती दिली की याशिवाय काठेवाडी लोकांकडून त्यांची जनावरे औद्योगिक परिसरांत कुंपण तोडून आंतमध्ये दाखल करीत असल्याबाबत व याबद्दल मनाई करण्यांत आल्यास चौकीदारास मारहाण करीत असतात.<br>मा. अध्यक्ष महोदय यांनी महानगरपालिकेच्या प्रतिनिधी यांना सूचना केली की स्वच्छता राखण्यासंदर्भात महानगरपालिकेची महत्वाची भूमिका आहे. करीता स्वच्छता मोहिम राबविण्यांत यावी, तसेच मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याबाबतसुध्दा योग्य ती मोहिम राबवावी जेणेकरुन अटकाव होऊन अशा घटना होणार नाही, अशी सुचना केली. | महानगर पालिका |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | १२. मे. राधिका पॅकेजींग प्रा. लि., सी-२२, एमआयडीसी अेरिया, नांदगांव पेठ या उद्योग घटकामध्ये काम करणा-या तंत्रज्ञ / कामगार याच्यावर वारंवार हमला करुन मारझोड केल्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | सदर उद्योग घटकाने दि. १८/९/२००९ चे पत्रान्वये पोलिस आयुक्त, अमरावती यांचेकडे तक्रार केलेली आहे की त्यांच्या कारखान्यांत काम करणा-या तंत्रज्ञ व कामगार यांच्यावर कांही असामाजिक तत्व हमला करुन मारझोड करीत आहेत. सदर तंत्रज्ञ व कामगार हे एमआयडीसी क्षेत्रातच राहात असल्यामुळे सदर परिसर हा एकाकी परिसर आहे. मारझोड केल्यानंतर रितसर नांदगांव पेठ पोलिस स्टेशनमध्ये तक्रारीची नोंद करण्यांत आलेली आहे. तथापि याबाबत पोलिस विभागाकडून संबंधितावर कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे संबंधित उद्योग घटकाचे संचालक यांनी भिती दर्शविली आहे की पोलिस विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नसल्यामुळे त्यांचेकडे काम करीत असलेले तंत्रज्ञ / कामगार काम सोडून पळून जातील. त्यामुळे त्यांना त्यांचा उद्योग बंद करावा लागेल.<br>सदर बाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यांत आल्याची माहिती सभेत देण्यांत आली. करीता सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा, असे ठरले.(विषय बंद). | शहर पोलिस विभाग<br>जिल्हा परिषद<br>मऔविम |
| ३ | मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय. | | | |
| | १. एमआयडीसी, अचलपूर येथील भूखंड क्रमांक बी-४२ वर स्थानिक लोक बांधकामा मध्ये अडथळे निर्माण करीत असल्याबाबत. | दि अचलपूर तालुका महाबचत संघ, अचलपूर. | दि अचलपूर तालुका महाबचत संघ या बेरोजगार युवकांच्या संघटनेला एमआयडीसी अचलपूर येथे भूखंड क्रमांक बी-४२ चा ताबा ४/६/२००९ रोजी देण्यांत आला. सदर प्लॉटवर बांधकाम करण्याच्या दृष्टीने पाहणी करण्यास गेले असता त्यांना मारहाण करण्याची व आत्महत्या करण्याची धमकी दिली, अशी तक्रार सदर संघटनेने दिनांक ११.१२.२००९ चे पत्रान्वये केली.<br>या संबंधात कार्यालयीन पत्र दिनांक ११.१२.२००९ अन्वये प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत आली.<br>तसेच पोलीस स्टेशन अधिकारी, परतवाडा यांना सदर संघटनेने त्यांचेकडे दाखल केलेल्या दिनांक ३/७/२००९ च्या तक्रारीनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती कळविण्याची विनंती केली होती. त्यांचेकडून पत्र दिनांक १९.१२.२००९ अन्वये गैर अर्जदार सौ. ललीता शंकरराव बाहेकर आणि श्री. रविकांत शंकरराव बाहेकर, रा. जिवनपुरा. अचलपूर यांचे विरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल करुन प्रतिबंधक कार्यवाही करण्यांत आली आहे.<br>योग्य ती कार्यवाही करण्यांत आल्यामुळे सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा, असे ठरले (विषय बंद). | मऔविम |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | २. अंजनगांव सुर्जी येथील जिनींग फॅक्टरी लोड शेडींग मुळे अडचणीत आल्यबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | अंजनगांव सुर्जी येथील जिनींग फॅक्टरी येथे लोड शेडींगमुळे सदर उद्योग अडचणीत आलेला आहे, करीता लोडशेडींगचे वेळापत्रक तपासून त्यात बदल करावा, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली.<br>मा. अध्यक्ष महोदयांनी सदर लोडशेडींगबाबत अधिक्षक अभियंता, मराविविकंम, अमरावती यांना पत्र लिहावे, अशी सूचना केली. | मराविविकंम |

आभार प्रदर्शनानंतर मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभा समाप्त करण्यांत आली.

स्वा/-
अपर जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र.

स्वा/-
महाव्यवस्थापक,
जि.उ.कें. तथा
सदस्य-सचिव, जि.उ.मि.,अमरावती.